# मुकुल माधवकडून वादळग्रस्तांना मदत

**पुणे** : कोरोना महामारी, निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) मदतीचा हातभार लावला. विविध स्तरांतील वंचित घटकांना, तसेच कोरोनायोद्ध्यांना पाठबळ देण्याचे काम फाउंडेशनने केले. संस्थेचा २६ वा वर्धापनदिवस नुकताच झाला. या निमित्ताने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. छाब्रिया म्हणाल्या, रोजंदारीवरील, स्थलांतरित मजूर, प्लम्बर आदी घटकांना ग्रोसरी किट, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. अन्नामित्र आणि विकास खन्नाज फीड इंडिया यांच्या सहकार्याने लाखो लोकांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. तसेच पुण्यातून बाहेरगावी जाणाऱ्या १३ हजार स्थलांतरित मजुरांना चप्पल, खाद्य दिले. राजस्थानातील संगीत कलाकार, पुण्यातील तृतीयपंथी समाजाला रेशन देण्यात आले.